## प्रस्तावना

संसदीय लोकशाही पद्धत अस्तित्वात असणाऱ्या देशात कार्यकारी प्रशासन यंत्रणेवर अंकुश ठेवण्यासाठी "प्रश्न" या संसदीय आयुधांचा वापर करण्यात येतो.

संसदीय लोकशाहीत ज्या प्रकारे प्रबळ शासनाची आवश्यकता असते त्याच प्रकारे शासनाच्या धोरणांमधील नेमक्या उणीवा शोधून त्यावर प्रश्नचिन्ह उपस्थित करणारा तेवढाच सक्षम लोकप्रतिनिधी असणे, हे उत्तम लोकशाहीचे द्योतक आहे. लोकप्रतिनिधी या नात्याने कर्तव्य बजाविण्यासाठी तसेच शासनाच्या प्रशासनिक कामकाजावर संसद/विधानमंडळाचे प्रभावी नियंत्रण असण्याच्या दृष्टिने प्रशासनिक कामकाजासंबंधी माहिती देणे (to seek information) हा संसद/विधानमंडळ सदस्यांच्या अधिष्ठीत (Inherent) व अनिर्बंध (unfettered) स्वरूपाचा अधिकार आहे. राज्यातील जनतेच्या सार्वजनिक हिताच्या संदर्भात सदस्यांच्या निदर्शनास येणाऱ्या विविध तक्रारी, अडचणी, समस्या सोडविण्याच्या दृष्टीने तसेच राज्याच्या शासन यंत्रणेद्वारे होत असलेल्या प्रशासनातील उणिवा दूर करून घेण्यासाठी किंवा या उणिवा शासनाच्या निदर्शनास आणण्यासाठी तथा त्याबाबत शासनाची भूमिका समजावून घेण्यासाठी प्रश्नोत्तरे या माध्यमाचा अतिशय प्रभावीपणे उपयोग करता येतो. पर्यायाने या प्रश्नोत्तरांच्या माध्यमामुळे शासनालाही प्रशासन यंत्रणेच्या कारभाराबाबत तसेच त्यातील उणिवा दूर करण्याच्या दृष्टीने माहिती मिळत असते. वरील सर्व बाबींचा सर्वंकष विचार करून तारांकित प्रश्न, अतारांकित प्रश्न, अल्पसूचना प्रश्न व प्रश्नाच्या उत्तरातून उद्‌भवलेल्या अर्धा-तास चर्चा इत्यादी संसदीय आयुधांचा वापर करण्यासंबंधीची माहिती प्रस्तुत पुस्तिकेत संक्षेपाने दिली आहे. सदरील माहिती मा. सदस्यांना प्रश्न या आयुधाचा वापर करताना उपयुक्त ठरेल अशी अपेक्षा आहे.

**विधान भवन**

मुंबई

दिनांक : १ नोव्हेंबर, २०१९.

सचिव,

महाराष्ट्र विधानसभा.

१

# विधानसभेतील प्रश्नोत्तरे

## १. पार्श्वभूमी

साधारणतः विधानसभेच्या अधिवेशनात प्रत्येक बैठकीचा पहिला तास प्रश्नोत्तरासाठी राखून ठेवण्यात येतो, संसदीय लोकशाहीमध्ये लोकप्रतिनिधींना जी अनेक संसदीय आयुधे उपलब्ध आहेत त्यामध्ये अत्यंत महत्त्वाचे व परिणामकारक असे प्रश्नोत्तरांचे आयुध आहे. अगदी थोड्या वेळात अनेक हेतू, तक्रारी, अडचणी, समस्या प्रश्नोत्तरांद्वारे साध्य करता येतात. राज्य शासनाच्या विविध योजना व राज्यकारभारासबंधीचे विविध प्रश्न व कार्यपद्धती याबाबत असलेल्या जनतेच्या तक्रारी लोकप्रतिनिधींना प्रश्नाद्वारे सभागृहासमोर मांडता येतात. जनतेच्या तक्रारी, अडचणी याबाबत शासनाची भूमिका समजून घेण्यासाठी आणि लोकांच्या तक्रारी/ गाऱ्हाणी शासनाच्या निदर्शनास आणण्यासाठी प्रश्नोत्तरे पद्धतीचा उपयोग होतो.

विधानसभेच्या बैठकीची सुरुवात प्रश्नोत्तरांच्या तासाने होते. ह्याबाबतची पद्धती विधानसभा नियमावलीतील नियम क्रमांक ६८ ते ९३ ह्यात विस्ताराने दिली आहे. राज्य शासनाच्या विविध प्रशासकीय कार्यपद्धती व विविध योजनांच्या यशापयशाचे तसेच योजनांमध्ये झालेला गैरव्यवहार याबाबत लोकप्रतिनिधींनी प्रश्नाद्वारे विचारलेली माहिती माननीय मंत्रिमहोदयांना अनुपूरक प्रश्नोत्तरांच्या वेळी तोंडी व तात्काळ देणे आवश्यक असते. प्रश्नोत्तराचा तास खऱ्या अर्थाने चर्चात्मक लोकशाहीचा गाभा असल्यामुळे प्रश्नोत्तरांच्या तासाला मंत्रिमहोदयांचे व पर्यायाने राज्यशासनाचे सारे कौशल्य व कसब कसोटीला लागते.

विधानसभेच्या प्रश्न या आयुधाकरिता QIS ही संगणकीय प्रणाली विकसित करण्यात आली असून, या संगणकीय प्रणालीद्वारे सदस्यांकडून प्रश्न सूचना स्वीकारणे, प्रश्न सूचना कार्यवाहीत घेणे, सादर करणे, प्रश्न सूचना विभागास पाठविणे, विभागाकडून उत्तरे स्वीकारणे, प्रश्नांचे सदस्यनिहाय बॅलट काढणे, तारांकित प्रश्नोत्तरांची यादी तयार करणे इ. सर्व कामे केली जातात. अशा प्रकारे प्रश्न या आयुधावर संपूर्णतः ऑनलाईन पद्धतीने कार्यवाही करणारे महाराष्ट्र हे देशातील पहिले राज्य आहे.

प्रश्नोत्तराचा तास म्हणजे संसदीय कामकाजपद्धतीमधील सर्वात महत्त्वाचा घटक आहे. लोकप्रतिनिधी व माननीय मंत्री यांच्यामध्ये प्रत्यक्ष प्रश्नोत्तरांद्वारे चर्चा होत असल्याने व त्या चर्चेचे प्रतिबिंब संपूर्ण राज्यात वृत्तपत्राद्वारे ठळकपणे उमटत असल्यामुळे प्रश्नोत्तरांच्या तासाला अनन्यसाधारण महत्त्व आहे.

**२. प्रश्नांचे खालील तीन प्रकार आहेत—**

**(अ) तारांकित प्रश्न**

**(ब) अतारांकित प्रश्न**

**(क) अल्पसूचना प्रश्न**

**(अ) तारांकित प्रश्न :–**

ज्या प्रश्नांना सभागृहात तोंडी उत्तरे दिली जातात, अशा प्रश्नांना तारांकित प्रश्न असे म्हणतात. म.वि.स. नियम ७२ (१) नुसार सदस्यांना तारांकित प्रश्न वेळेवर देता यावेत यादृष्टीने त्यांच्याकडे विधानमंडळ सचिवालयातर्फे अधिवेशनाच्या साधारणतः ४५ दिवस अगोदर तारांकित प्रश्नांचा **"चक्रानुक्रम"** (रोटेशन ऑर्डर) विधानसभा **पत्रक भाग दोनद्वारे** माहितीसाठी पाठविण्यात येतो तसेच विधानमंडळाच्या संकेतस्थळावरदेखील उपलब्ध करून देण्यात येतो व त्याबाबत सर्व सदस्यांना लघुसंदेशाद्वारे (एस.एम.एस.) कळविण्यात येते. निरनिराळ्या मंत्र्यांना त्यांच्या विभागाशी संबंधित प्रश्नांना उत्तरे देणे सोयीचे व्हावे यादृष्टीने चक्रानुक्रमात मंत्र्यांची गटवार विभागणी केली जाते व एकाच मंत्र्याला विधानसभा/विधानपरिषदेत एकाच दिवशी प्रश्नोत्तरासाठी जावे लागणार नाही याबाबत दक्षता घेण्यात येते. अशा प्रकारच्या गटवार विभागणीत गरजेनुसार वेळोवेळी बदल केला जातो. निरनिराळ्या मंत्र्यांकडे असलेल्या विभागासंबंधीचे तारांकित प्रश्न तोंडी उत्तराकरिता कोणत्या दिनांकास घेण्यात येतील, ते दिनांक चक्रानुक्रमात दिलेले असतात. याप्रमाणे आठवड्यातील सोमवार ते शुक्रवार या पाच दिवसांसाठी पाच गट तयार केलेले असतात. चक्रानुक्रमात (१) गट क्रमांक, (२) गटामध्ये समाविष्ट असलेले मंत्री, (३) प्रश्नाच्या उत्तराचा दिनांक, (४) प्रश्नाची सूचना

विधानमंडळ सचिवालयात मिळण्याचा अखेरचा दिनांक, तसेच मंत्र्यांचे नाव व त्यांच्या अधिनस्त असलेले विभाग यासंबंधीचे विवरण इत्यादी बाबी दाखविलेल्या असतात. अधिवेशन काळात दर आठवड्याला सोमवारपासून शुक्रवारपर्यंत ज्या दिवशी विधानसभेच्या बैठका असतात त्या प्रत्येक दिवशी सुरुवातीचा एक तास तारांकित प्रश्नोत्तरांसाठी उपलब्ध असतो (म.वि.स. नियम १७). उपरोक्त एका-एका गटातील मंत्र्यांच्या अधिनस्त असलेल्या विभागांसबंधीच्या तारांकित प्रश्नोत्तरांची मुद्रित यादी बैठक सुरू होण्यापूर्वी दोन तास आधी सदस्यांना वितरीत केली जाते. अधिवेशनकाळात एखाद्या दिवशी काही कारणास्तव सभागृहाची बैठक न झाल्यास त्या दिवसाची तारांकित प्रश्नोत्तराची यादी दुसऱ्या दिवशी किंवा मा. अध्यक्ष, विधानसभा यांनी नेमून दिलेल्या लगतच्या पुढील उपलब्ध दिवशी प्रश्नोत्तराच्या तासानंतर सचिवांकडून सभागृहाच्या पटलावर ठेवण्यात येते.

तारांकित प्रश्नाच्या उत्तरावर मा. अध्यक्षांच्या परवानगीने सदस्यांना पुरवणी प्रश्न विचारुन अधिक खुलासा वा स्पष्टीकरणही घेता येते. कोणत्याही सदस्याला एका दिवसाकरिता पाच तारांकित प्रश्न उपस्थित करता येतात, त्यापैकी कमाल तीन तारांकित स्वीकृत प्रश्नांचा तारांकित प्रश्नोत्तराच्या यादीमध्ये समावेश करता येतो. सभागृहात आपल्या तारांकित प्रश्नांची उत्तरे कोणत्या अग्रक्रमाने हवी आहेत तो क्रमही तारांकित प्रश्नांची सूचना देताना सदस्यांनी नमूद करणे आवश्यक आहे. असा क्रम नमूद केला नसेल तर त्या दिवसाकरिता त्या सदस्यांचे प्रश्न ज्या क्रमाने विधानमंडळ सचिवालयाकडे आलेले असतील त्याच क्रमाने त्या दिवसाच्या तारांकित प्रश्नोत्तराच्या यादीत दर्शविण्यात येतात **[म.वि.स. नियम ७७ (३)].** अध्यक्षांना योग्य वाटल्यास तारांकित प्रश्नांची सूचना देणाऱ्या सदस्यास प्रश्नाला तोंडी उत्तरच का हवे, ह्याची कारणे थोडक्यात नमूद करण्यात सांगता येते आणि त्या कारणांचा विचार केल्यानंतर त्या प्रश्नांचा समावेश तारांकित किंवा अतारांकित प्रश्नांच्या यादीत करण्याचा निदेश मा. अध्यक्ष देऊ शकतात **(म.वि.स. नियम ७३).** तारांकित प्रश्नाचे उत्तर ज्या दिनांकास हवे असेल **त्याच्या ३० दिवस आधी** अशा प्रश्नांची सूचना मा. सदस्यांकडून विधानमंडळ सचिवालयास QIS या संगणकीय प्रणालीद्वारे मिळणे आवश्यक आहे. **(म.वि.स. नियम ७४)** तसेच सदर प्रश्न देताना सदस्यांनी कोणत्या मंत्र्याला उद्देशून प्रश्न विचारला आहे हे देखील त्या सूचनेत नमूद करणे आवश्यक आहे.

(शा.म.मुं.) एचबी १७८२—२ (१०००—१०-२०१९)

**(ब) अतारांकित प्रश्न :–**

जेव्हा सदस्यांना त्यांच्या प्रश्नांना फक्त लेखी स्वरूपात माहितीवजा किंवा विस्तृत आकडेवारी अशा स्वरूपाची उत्तरे हवी असतील अशा वेळी माननीय सदस्य अतारांकित प्रश्नांची सूचना देऊ शकतात. अशा प्रश्नांची सूचना देण्याकरिता कोणताही कालावधी विहित करण्यात आलेला नाही. त्यामुळे अतारांकित प्रश्नांच्या सूचना माननीय सदस्य वर्षभरात सत्र व निःसत्र कालावधीत केव्हाही देऊ शकतात. मा. अध्यक्षांनी स्वीकृत केलेले अतारांकित प्रश्न शासनाच्या संबंधित विभागाकडे पाठविल्यानंतर प्रश्न विभागाला मिळाल्याच्या दिनांकापासून ३० दिवसांच्या आत त्याचे उत्तर संबंधित विभागाने देणे आवश्यक आहे **[ म.वि.स. नियम ७२ (२) ].** विभागाकडून प्राप्त झालेली प्रश्नांची उत्तरे विधानमंडळ सचिवालयामार्फत संकलित केली जातात व ५० प्रश्नोत्तरांची प्रत्येकी एक यादी याप्रमाणे मुद्रीत करून सदर यादी "अतारांकित प्रश्नोत्तरांची यादी" या शिर्षकाखाली समाविष्ट करून सचिवांकडून सभागृहाच्या पटलावर ठेवण्यात येते. तद्नंतर निःसत्र कालावधीत प्रत्येक १५ दिवसांनी किंवा दर महिन्याला सदरहू प्रश्नोत्तरांची यादी मा.अध्यक्षांना सादर केल्यानंतर, मा.अध्यक्षांच्या निदेशानुसार सदस्यांना विधानमंडळाच्या संकेतस्थळावरदेखील उपलब्ध करून देण्यात येतात व तसे सदस्यांना लघुसंदेशाद्वारे (एस.एम.एस.) कळविण्यात येते. सभागृहाच्या पुढच्या अधिवेशनात पहिल्या आठवड्यात सोईस्कर वेळी अशी अतारांकित प्रश्नांची यादी सचिवांकडून सभागृहाच्या पटलावर ठेवण्यात येते.

जे प्रश्न तोंडी उत्तरासाठी तारांकित प्रश्नांच्या यादीत समाविष्ट होऊनही प्रश्नोत्तरांचा तास समाप्त झाल्यामुळे उत्तरीत होऊ शकले नाहीत असे प्रश्न अतारांकित समजले जातात व त्यांची उत्तरे त्या दिवसाच्या कार्यवाहीत छापली जातात (म.वि.स. नियम ८०).

**(क) अल्पसूचना प्रश्न :–**

एखाद्या सार्वजनिक महत्त्वाच्या व निकडीच्या प्रश्नाचे उत्तर मा. सदस्यांना ताबडतोब पाहिजे असल्यास सदस्यांनी त्याबाबत QIS या संगणकीय प्रणालीद्वारे अल्पसूचना प्रश्न सूचना दिली पाहिजे **[ म.वि.स. नियम ८६ (१) ].** अल्पसूचना प्रश्नावर तारांकित

प्रश्नाप्रमाणे पुरवणी प्रश्न विचारता येतो. हे प्रश्न तातडीने उपस्थित झालेल्या सार्वजनिक महत्त्वाच्या बाबीवर असले पाहिजेत. अल्पसूचना प्रश्नाची सूचना देताना तो अल्पसूचना प्रश्न म्हणून का देण्यात येत आहे, याचे स्पष्टीकरणही सूचनेमध्ये नमूद करणे आवश्यक असते व त्यानंतर ज्या विषयावर प्रश्न विचारावयाचा आहे तो थोडक्यात व मुद्देसूदपणे विचारावा लागतो. अशी सूचना अधिवेशनाच्या किंवा स्थगित केलेल्या अधिवेशनाच्या **प्रारंभापूर्वी ७ दिवसांच्या** आधीची नसली पाहिजे. अल्पसूचना प्रश्नाद्वारे विचारलेली माहिती **प्रश्न शासनास मिळाल्याच्या दिनांकापासून ७ दिवसांचे आत व ती माहिती बृहन्मुंबईच्या बाहेरील असल्यास १४ दिवसांच्या आत** देणे आवश्यक आहे [**म.वि.स. नियम ८६ (४)**]. असा प्रश्न मा. अध्यक्षांनी स्वीकृत केल्यानंतर संबंधित मंत्री उत्तर देण्यास तयार आहेत किंवा कसे याबाबत या सचिवालयाकडून विचारणा केली जाते. संबंधित मंत्री तयार असल्यास व त्यास मा. अध्यक्ष महोदयांनी अनुमती दिल्यास मंत्र्यांना सोईस्कर असेल अशा कोणत्याही दिवशी सदरहू अल्पसूचना प्रश्न त्या दिवसाच्या कामकाजाच्या क्रमात दाखविण्यात येतो. असा प्रश्न त्या दिवसाच्या कामकाजामध्ये तारांकित प्रश्नोत्तरांच्या आधी घेण्यात येतो व त्यावर तारांकित प्रश्नाप्रमाणेच अनुपूरक प्रश्नोत्तरे होतात.

### ३. कोणते प्रश्न स्वीकृत होतात :–

तारांकित प्रश्नांचा चक्रानुक्रम सदस्यांना पाठविण्यात आल्यानंतर तारांकित प्रश्नांची सूचना विधानमंडळ सचिवालयाकडे सदस्य पाठवित असतात. तारांकित प्रश्न स्वीकृत होण्यासाठी जो प्रश्न विचारला जातो, त्या प्रश्नातील विषयाबाबत राज्य शासन प्रामुख्याने जबाबदार असणे, प्रश्नाधीन विषय सार्वजनिक महत्त्वाचा व तातडीचा असणे तसेच प्रश्नाला वस्तुस्थितीचा आधार असणे आवश्यक आहे.

राज्य शासनाची जबाबदारी, विविध अधिनियम व नियमांद्वारे राज्य शासनास प्राप्त होणाऱ्या अधिकाराच्या व मर्यादेच्या अनुषंगाने आजमावली जाते.

विद्यापीठे, स्वायत्त संस्था यांच्या अधिकारक्षेत्रात येणाऱ्या बाबीसंबंधी तसेच राज्य परिवहन महामंडळ, जिल्हा परिषदा, पंचायत समित्या, ग्रामपंचायती यासारख्या स्थानिक स्वराज्य

संस्थांच्या अधिकारक्षेत्रात येणाऱ्या विषयासंबंधीचे प्रश्न स्वीकृतीचे वेळी तत्संबंधी करण्यात आलेल्या अधिनियमातील तरतुदी, शासनाचे नियंत्रण वा जबाबदारी व संबंध ह्यांचा परामर्श घेऊन सार्वजनिक महत्त्वही लक्षात घेतले जाते.

राज्य लोकसेवा आयोग, मुख्यमंत्री सहाय्यता निधी, राज्य शेती महामंडळ, राज्य वित्तीय महामंडळ, महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी मर्यादित (महावितरण), महाराष्ट्र राज्य वीज निर्मिती कंपनी मर्यादित (महानिर्मिती), महाराष्ट्र राज्य विद्युत पारेषण कंपनी मर्यादित (महापारेषण), महाराष्ट्र राज्य गृहनिर्माण महामंडळ, महाराष्ट्र कामगार कल्याण मंडळ, खादी ग्रामोद्योग मंडळ यासारख्या स्वतंत्र, स्वायत्त व वैधानिक संस्था यासंबंधीच्या प्रश्नांच्या स्वीकृतीच्या वेळी त्या-त्या बाबतीतील उपरोक्त संस्थावरील शासनाचे नियंत्रण, जबाबदारी व संबंध आदी बाबी विचारात घेतल्या जातात. मा. उच्च न्यायालय व धर्मादाय आयुक्त यांच्या कक्षेतील विषयाबाबत राज्य शासनाची जबाबदारी येत नसल्यामुळे तसेच न्यायिक प्रक्रियेच्या संदर्भात शासनाने हस्तक्षेप करणे उचित नाही म्हणून सर्वसाधारणपणे मा. उच्च न्यायालय तसेच धर्मादाय आयुक्त यांच्या संदर्भातील प्रश्न स्वीकारले जात नाहीत.

केंद्र शासन पुरस्कृत काही योजना राज्य शासनाकडे राबविण्यासाठी दिल्या असतील तर त्याबाबतचे प्रश्न (उदा. राज्य कामगार विमा योजना, प्रधानमंत्री ग्रामसडक योजना, राष्ट्रीय पेयजल योजना, राष्ट्रीय संवर्धन योजना, प्रधानमंत्री कृषि सिंचन योजना, राष्ट्रीय कृषि विकास योजना, महात्मा फुले जल व भूमी संधारण अभियान, राष्ट्रीय हरीतसेना योजना) त्या विषयाबाबत राज्य शासनाची असलेली जबाबदारी आणि नियंत्रण याचा विचार करून प्रश्न स्वीकृत अगर अस्वीकृत केले जातात. सर्वसाधारणतः व्यक्तिगत तक्रारींच्या स्वरूपाचे प्रश्न अस्वीकार्य ठरतात. परंतु, व्यक्तिगत स्वरूपाच्या प्रश्नांत सार्वजनिक महत्त्व असेल किंवा एखादे तत्व किंवा धोरण समाविष्ट असेल तर प्रश्न स्वीकारतेवेळी मा. अध्यक्षांकडून वेगळा विचार केला जाऊ शकतो.

काही प्रश्न सभागृहापुढे येण्याच्या दृष्टीने गौण सार्वजनिक महत्त्वाचे असतात. अशा प्रश्नांच्या बाबतीत अध्यक्षांनी प्रश्नाधीन बाब गौण सार्वजनिक महत्त्वाची म्हणून सदस्यांनी प्रथम संबंधित मंत्रीमहोदयांकडे जाऊन दाद मागावी असे आदेश दिले असतील तर अशा

प्रश्नांच्या बाबतीत प्रथम सदस्यांनी मंत्र्याकडे जाऊन त्याबाबत दाद मागावी लागते. याबाबत सदस्यांना माहिती देण्यासंबंधी शासनाद्वारे विविध विभागांना सूचनाही दिल्या गेलेल्या आहेत. सदस्यांनी अध्यक्षांच्या आदेशानुसार मंत्र्यांकडे सदर प्रकरण नेल्यावरही दाद लागली नाही तर अशा प्रश्नावर अध्यक्षांना स्वीकृतीबाबत फेरविचार करता येतो.

एखाद्या अधिवेशनासाठी स्वीकृत झालेले तारांकित वा अल्पसूचना प्रश्न तसेच इतर सूचना अधिवेशनाच्या समाप्तीनंतर व्यपगत होतात (म.वि.स. नियम २०). पुढील अधिवेशनासाठी वाटल्यास, सदस्य अशा प्रश्नांची फेरसूचना देऊ शकतात.

## ४. प्रश्न अस्वीकृत केव्हा होतात?

आपले प्रश्न अध्यक्षांनी अस्वीकृत करू नयेत असे सदस्यांना वाटणे स्वाभाविक आहे. आपल्या तारांकित प्रश्नांच्या सूचना अस्वीकृत होऊ नयेत म्हणून तारांकित प्रश्नांची सूचना देताना सदस्यांनी खालील गोष्टींची खबरदारी बाळगल्यास सदस्यांचे प्रश्न स्वीकृत होण्यास मदत होईल. कोणते प्रश्न अस्वीकृत ठरतात याविषयी विधानसभा नियमावलीतील नियम ७० मध्ये नमूद केलेल्या तरतूदींकडे सदस्यांचे लक्ष वेधण्यात येत आहे :—

(१) प्रश्नांमध्ये आवश्यक नसल्यास, कोणाचेही नाव किंवा विधान त्यात आणता कामा नये ;

(२) प्रश्नात एखादे विधान असेल तर प्रश्न विचारणाऱ्या सदस्याने त्या विधानाच्या अचूकतेबद्दल जबाबदार राहिले पाहिजे ;

(३) एखाद्या सार्वजनिक बाबीसंबंधाने शासनाच्या हेतूविषयी त्यात स्पष्टीकरण मागता येईल, परंतु तो प्रश्न, प्रश्न विचारणाऱ्या सदस्याने उपस्थित केलेल्या बाबीसंबंधात कोणतीही विशिष्ट कारवाई करण्यासंबंधी वस्तुतः सूचना असता कामा नये ;

(४) प्रश्नात कोणतेही युक्तिवाद, अनुमाने, दोषारोप, वक्रोक्तिपूर्ण शब्दप्रयोग, उपाधी किंवा बदनामीकारक विधाने असता कामा नये ;

(५) प्रश्नात अभिप्राय व्यक्त करण्याविषयीची किंवा कायद्याच्या तात्त्विक प्रश्नांची किंवा काल्पनिक सिद्धांताची उकल करण्याविषयी मागणी करता कामा नये ;

(६) प्रश्नात पदांच्या किंवा सार्वजनिक नात्याने असेल त्या व्यतिरिक्त कोणत्याही व्यक्तीचे चारित्र्य किंवा वर्तन याविषयी उल्लेख असता कामा नये ;

(७) प्रश्नात विधानसभेने नेमलेल्या कोणत्याही समितीतील कामकाजाविषयी माहिती विचारलेली असता कामा नये ;

(८) प्रश्न अतिशय लांबलचक असता कामा नये ;

(९) प्रश्नात ज्याच्या वर्तनावर फक्त मूळ प्रस्तावाच्या रुपाने आक्षेप घेता येईल अशा कोणत्याही व्यक्तीचे चारित्र्य किंवा वर्तन याविषयी ठपका ठेवलेला असता कामा नये ;

(१०) प्रश्नात वैयक्तिक चारित्र्यावर आरोप केले असता किंवा असे आरोप गर्भित असता कामा नये ;

(११) प्रश्नाच्या उत्तरात स्पष्टीकरण करता येणे शक्य होणार नाही इतके मोठे धोरणविषयक प्रश्न उपस्थित करता कामा नये ;

(१२) आधीच उत्तर दिलेल्या किंवा ज्यास उत्तर देण्याचे नाकारण्यात आले असेल अशा प्रश्नांच्या आशयाची पुनरुक्ती असता कामा नये ;

(१३) प्रश्नात शुल्लक बाबीसंबंधी माहिती विचारता कामा नये ;

(१४) प्रश्नात सामान्यतः गत इतिहाससंबंधी माहिती विचारण्याचा हेतू असता कामा नये ;

(१५) प्रश्नात पाहता येण्याजोगा कागदपत्रात किंवा सामान्य संदर्भग्रंथात दिलेली माहिती मागता कामा नये ;

(१६) महाराष्ट्र शासनाला प्रामुख्याने जबाबदार नसलेल्या संस्थांच्या किंवा व्यक्तींच्या नियंत्रणाखाली असलेल्या बाबी उपस्थित करता कामा नये ;

(१७) प्रश्नात गुप्त स्वरूपाच्या बाबीसंबंधी माहिती विचारण्याचा हेतू असता कामा नये, आणि

(१८) एखाद्या बाबींशी मंत्र्याचा पदपरत्वे संबंध नसेल अशा बाबीसंबंधी असता कामा नये.

उपरोक्त नियमाच्या तरतुदीनुसार प्रश्नात अनुमाने, दोषारोप, उपरोधिक शब्द किंवा बदनामीकारक मजकूर असता कामा नये, तसेच विधानमंडळ हे मा. अध्यक्ष यांच्या अखत्यारीखाली काम करीत असल्याने त्यासबंधी कोणताही प्रश्न विचारता येत नाही.

## ५. प्रश्न विचारताना सदस्यांनी घ्यावयाची काळजी

सदस्यांना प्रश्नाची सूचना देण्यास मदत व्हावी म्हणून मंत्री आणि त्यांच्या अधीन असलेले विभाग व प्रत्येक विभागाकडे सोपविलेले विषय याबाबतची माहिती असलेल्या "महाराष्ट्र शासनाच्या मंत्रालयीन विभागांकडे सोपविलेले विषय" या पुस्तिकेच्या प्रती सदस्यांना वितरीत करण्यात येतात, त्याचा त्यांनी प्रश्न देताना अवश्य उपयोग करावा. प्रत्येक प्रश्न हा शासनाच्या एकाच विभागाशी संबंधित असावा, त्यात एकापेक्षा अधिक विषय आणू नयेत. तो सुस्पष्ट, सुसंबद्ध, मुद्देसूद व सुटसुटीत असावा आणि प्रश्नाची सूचना मा. सदस्यांकडून विधानमंडळ सचिवालयास QIS या संगणकीय प्रणालीद्वारे मिळणे आवश्यक आहे.

कोणत्याही प्रश्नाची सूचना देताना आपल्या प्रश्न सूचनेत खालील बाबींचा प्रामुख्याने उल्लेख करून प्रश्न सूचना दिल्यास त्यांचे प्रश्न गुणवत्तेवर स्वीकृत होऊ शकतात.

**उदा. (१)** प्रश्नात उल्लेखित निवेदन कोणी, कोणास व केंव्हा दिले याबाबत स्पष्ट उल्लेख असावा.

**(२)** प्रश्नाधिन घटना नक्की कोणत्या गावात/तालुक्यात/जिल्ह्यात आणि निश्चित केव्हा घडली आहे याचा दिनांकासह उल्लेख असावा.

**(३)** प्रश्नाद्वारे निश्चित कोणत्या कालावधीतील माहिती अपेक्षित आहे तो कालावधी प्रश्नसूचनेत स्पष्टपणे नमूद करणे आवश्यक आहे.

**(४)** प्रश्नामध्ये उल्लेखित मागणी अथवा तक्रार "शासनाकडे केली आहे" असा उल्लेख केला जातो. प्रश्न स्वीकृत होण्यासाठी प्रश्नात उल्लेखित मागणी अथवा तक्रार कोणी, नक्की केव्हा म्हणजे कोणत्या दिनांकास आणि शासनाच्या निश्चित कोणत्या अधिकाऱ्याकडे केली आहे याचा स्पष्ट उल्लेख करणे आवश्यक आहे.

**(५)** एखाद्या प्रश्नात गैरव्यवहार/भ्रष्टाचार याबाबत उल्लेख केला असल्यास या गैरव्यवहाराचे/भ्रष्टाचाराचे स्वरूप काय आहे, त्यामध्ये गुंतलेले कर्मचारी अधिकारी कोण आहे, गैरव्यवहार/भ्रष्टाचाराबाबत कोणी केव्हा तक्रार केली अथवा घटना केव्हा निदर्शनास आली, त्यामध्ये अंदाजे किती रकमेचा गैरव्यवहार/भ्रष्टाचार झाला आहे इत्यादीबाबत स्पष्ट उल्लेख करणे आवश्यक आहे. सदस्यांनी आपल्या प्रश्न सूचनेत उक्त बाबींचा प्रामुख्याने उल्लेख केला नसल्यास प्रश्नाचे स्वरूप (तारांकित प्रश्न, अल्प सूचना प्रश्न, अतारांकित प्रश्न) निश्चित करण्यासाठी सदस्यांकडून साधारणतः खालील मुद्यांबाबत खुलासा मागविण्यात येतो :—

(१) आपली नक्की तक्रार काय आहे?

(२) प्रश्न विचारण्यामागे आपला निश्चित हेतू कोणता आहे?

(३) प्रश्नाचे तोंडीच उत्तर आपणास का हवे आहे?

(४) प्रश्न नक्की कोणत्या गावातील, तालुक्यातील, जिल्ह्यातील आहे?

(५) प्रश्नाधीन माहिती निश्चित कोणत्या कालावधीची हवी आहे?

(६) प्रश्नाधीन घटना केव्हा घडली आहे?

(७) म.वि.स. नियम ७० (२) अन्वये प्रश्नावरील विधानाच्या सत्यतेबाबत आपण जबाबदारी घेण्यास तयार आहात काय?

(८) प्रश्नाधीन मागणी कोणी, केव्हा व शासनाकडे म्हणजे निश्चित कोणत्या अधिकाऱ्याकडे केली आहे?

(९) प्रश्नाधीन माहिती पूर्वी दिलेल्या उत्तरात समाविष्ट असल्यास सदरहू प्रश्नाबाबत आपला आग्रह आहे काय? असल्यास, कोणत्या मुद्यांबाबत? इत्यादी.

एखाद्या प्रश्नाच्या बाबतीत सदस्यांकडून काही खुलासा मागविला असेल आणि सदस्यांकडून त्या खुलाशाचे उत्तर आले नाही किंवा उत्तर इतक्या उशिराने आले असेल की, ते विचारात घेता येणे आणि जो प्रश्न स्वीकृत करण्यात आला तर समुचित दिनांकाच्या प्रश्नांच्या यादीत समाविष्ट करणे शक्य नसेल तर, असे प्रश्न व्यपगत ठरविण्याचा अधिकार मा. अध्यक्षांना आहे (म.वि.स. नियम ८५).

### ६. बॅलट

अधिवेशनातील प्रत्येक आठवड्यातील तारांकित स्वीकृत प्रश्नांचा प्राथम्यक्रम ठरविण्याकरिता मा. अध्यक्ष यांनी सदस्यनिहाय बॅलट घेण्याबाबत निदेश दिलेला आहे (पुनरीक्षित निदेश क्र.१०). त्यानुसार अधिवेशनात प्रश्नोत्तरासाठी नेमून दिलेल्या प्रत्येक आठवड्यातील प्रत्येक दिवसासाठी स्वीकृत झालेल्या तारांकित प्रश्नांचा पारस्पारिक प्राथम्यक्रम ठरविण्यासाठी सदस्यनिहाय बॅलट त्यापूर्वीच्या **आठवड्यातील सोमवारी सांयकाळी ४.०० वाजता** QIS या संगणकीय प्रणालीद्वारे घेण्यात येते. सोमवारी सार्वजनिक सुट्टी असल्यास, त्याच्या आधीच्या आठवड्यातील कामकाजाच्या शेवटच्या दिवशी **सांयकाळी** ४.०० वाजता घेण्यात येते. यासंबंधात सदस्यांना **पत्रक भाग (२) द्वारे व लघुसंदेशाद्वारे (एस.एम.एस.)** आगाऊ माहिती दिली जाते.

### ७. प्रश्न सूची

एखाद्या विशिष्ट दिवसाच्या तारांकित प्रश्नोत्तराच्या यादीमध्ये आपला प्रश्न कोणत्या क्रमांकावर आहे याबाबत सदस्यांना पूर्वकल्पना यावी तसेच त्या संबंधित दिवशी त्यांनी सभागृहामध्ये उपस्थित रहाता यावे, चर्चेत भाग घेता यावा तसेच अनुपूरक प्रश्नाद्वारे अधिक माहिती मिळविण्यासाठी प्रश्नाच्या संदर्भातील पूर्वतयारी करता यावी यासाठी प्रश्नोत्तराच्या दिनांकाच्या आदल्या दिवशी संबंधित तारांकित प्रश्नोत्तराच्या यादीमध्ये समाविष्ट असलेल्या प्रश्नांचा अनुक्रमांक, प्रश्न क्रमांक, प्रश्न विचारणारे सदस्य व प्रश्नाचा विषय इत्यादी माहिती समाविष्ट असलेली प्रश्नसूची मा. सदस्यांना वितरीत केली जाते तसेच विधानमंडळाच्या संकेतस्थळावरदेखील उपलब्ध करून देण्यात येते.

"प्रत्येक दिवसाच्या प्रश्नोत्तराच्या यादीतील पहिल्या, दुसऱ्या व तिसऱ्या फेरीतील प्रश्न बॅलटद्वारे ठरवलेल्या प्राथम्यक्रमांनुसार दाखविण्यात येतात."

## ८. अधिक माहिती

एखाद्या प्रश्नाच्या संदर्भात अनुपूरक प्रश्नोत्तराच्या वेळी मंत्र्यांनी अधिक माहिती सभागृहात देण्यासंबंधीचे आश्वासन दिले असेल अथवा मा. अध्यक्षांनी मंत्र्यांना अधिक माहिती सभागृहासमोर ठेवण्याचा निदेश दिला असेल तर, त्याप्रमाणे सभागृहासमोर अधिक माहिती ठेवण्यात येते. अधिक माहितीवर पुन्हा अनुपूरक प्रश्न विचारले जात नाहीत.

## ९. पुनरीक्षित उत्तर

प्रश्नोत्तराच्या वेळी एखाद्या प्रश्नाचे दिले गेलेले उत्तर बरोबर नाही असे निदर्शनास आले वा आणले तर त्याचे सुधारित उत्तर वा उत्तराची दुरुस्ती सभागृहासमोर ठेवण्यात येते. अशा प्रश्नावर पुन्हा अनुपूरक प्रश्न विचारले जात नाहीत.

कोणताही प्रश्न सहसा राखून ठेवला जात नाही. तथापि, एखादा प्रश्न राखून ठेवण्यात आल्यास, सदरहू प्रश्न मा. अध्यक्ष निदेश देतील त्या दिवशी तो उत्तरासाठी पुन्हा घेण्यात येतो आणि दिवसाच्या कामकाजाच्या क्रमात सदरहू प्रश्न प्रश्नोत्तराच्या तासात चर्चेसाठी सर्वप्रथम दर्शविण्यात येतो.

## १०. प्रश्नोत्तराच्या तासाचे महत्त्व

विधीमंडळ कामकाजात प्रश्नोत्तराच्या तासाला अनन्यसाधारण महत्त्व आहे. शासनाच्या विविध योजना विभागामार्फत राबविल्या जातात. प्रश्नाच्या रुपाने या योजनेच्या अंमलबजावणीतील त्रुटी वा उणीवा शासनाच्या निदर्शनास आणून विविध बाबींवर तसेच राज्यशासनाच्या एकंदर कार्यपद्धतीतील त्रुटीबाबत टिका टिप्पणी होऊन त्याप्रकरणी लोकांची गाऱ्हाणी दूर करता येतात. सभागृहात प्रश्न विचारणे म्हणजे मा. सदस्यांच्या हातातील एक अमोघ आयुध आहे. विभागाच्या कार्यपद्धतीतील दोष उदाहरणे दाखवून प्रश्नाद्वारे मा. मंत्र्यांना जाब विचारला जातो. शासन अशा प्रकरणी केलेल्या कारवाईबाबत सभागृहास अवगत करीत असते.

संसदीय लोकशाहीमध्ये प्रश्नोत्तराच्या तासाला अनन्यसाधारण महत्त्व असून त्याद्वारे तोंडी उत्तरित झालेल्या प्रश्नांमधून एखाद्या प्रश्नाची तड सभागृहात लावता येते.

## ११. अशासकीय सदस्यास उद्देशून प्रश्न

सभागृहासमोर चर्चेसाठी येणाऱ्या एखाद्या अशासकीय विधेयकासंबंधात किंवा प्रस्तावासंबंधात काही मुद्यांची माहिती घेण्याकरिता कोणत्याही सदस्यांना उक्त विधेयक किंवा प्रस्ताव उपस्थित करणाऱ्या सदस्याला उद्देशून प्रश्न विचारता येतो. अशा प्रश्नांची सूचना म.वि.स. नियम ९३ (१) अन्वये देता येते. उक्त प्रश्न स्वीकृत झाल्यास त्यावरील सभागृहात चर्चेची पद्धत मा. अध्यक्ष ठरवितात.

तेराव्या विधानसभेच्या सन २०१४ ते सन २०१९ मध्ये झालेल्या एकूण १८ अधिवेशनांपैकी प्रश्नोत्तरे असलेल्या १५ अधिवेशनांमध्ये मा. सदस्यांकडून एकूण १,३९,६२३ एवढे तारांकित प्रश्न विचारण्यात आले होते. विचारण्यात आलेल्या तारांकित प्रश्नांपैकी ११,५६८ एवढे प्रश्न स्वीकृत झाले होते. तसेच अतारांकित प्रश्नाच्या सूचनांपैकी व तारांकित प्रश्नांमधून मा. अध्यक्षांनी अतारांकित म्हणून स्वीकृत केलेले प्रश्न धरुन एकूण ३३,२९६ प्रश्न अतारांकित स्वीकृत करण्यात आले आणि प्राप्त झालेल्या १४७ अल्पसूचना प्रश्नांपैकी एकूण १० अल्पसूचना प्रश्न स्वीकृत झाले होते. सभागृहामध्ये तोंडी उत्तरित झालेल्या प्रश्नांमध्ये राज्यव्यापी असे अनेक विषय होते त्याची तड सभागृहात लागली. त्यापैकी काही प्रकरणे उदाहरणादाखल खालीलप्रमाणे आहेत :—

(१) "राज्यातील आदिवासी वसतीगृहातील विद्यार्थ्यांना राज्य मार्ग परिवहन महामंडळाच्या बसचा पास मोफत देण्याबाबत" या विषयावरील तारांकित प्रश्न क्रमांक ३३०३०, दिनांक ९ डिसेंबर, २०१५ रोजी सभागृहात उत्तरीत झाला. या प्रश्नावरील अनुपूरक प्रश्नोत्तराच्या वेळी, आदिवासी वाड्यापाड्यातून शिक्षणासाठी शहरात ये-जा करणाऱ्या विद्यार्थ्यांना एस.टी. बसचा मोफत पास देण्याबाबत या प्रश्नावर शासनाने, वसतीगृहात प्रवेश मिळालेल्या विद्यार्थ्यांना एस.टी बसचा मोफत पास देण्याचा तसेच ज्या विद्यार्थ्यांना प्रवेश देता आला नसला तरी जे विद्यार्थी आपल्या गावाहून बसने शाळेत किंवा महाविद्यालयात जात असतील त्यांनाही बसचा मोफत पास देण्याचा निर्णय घेतला.

(२) "वसई (जि. पालघर) तालुक्यातील गोखिवरे वन परिक्षेत्रामधील वनजमिनीवर झालेल्या अनधिकृत बांधकामांबाबत" या विषयावरील तारांकित प्रश्न क्रमांक ६००७७, दिनांक २८ जुलै, २०१६ रोजी सभागृहात उत्तरीत झाला. या प्रश्नावरील अनुपूरक प्रश्नोत्तराच्या वेळी, अतिक्रमणाकडे दुर्लक्ष केलेल्या संबंधित अधिकाऱ्यांना निलंबित करण्याचा निर्णय शासनाने घेतला तसेच अतिक्रमण झालेल्या वन क्षेत्रातील जमिनीवरील अतिक्रमण हटविण्यासाठी सॅटेलाईट सव्हिर्लन्स, गुगल मॅपिंग या सर्व तंत्रज्ञानाचा उपयोग करून त्याबाबतचा कायदा आणण्याबाबत निर्णय ही शासनाने घेतला.

(३) "जांबरुग (ता. कर्जत, जि. रायगड) येथे जलयुक्त शिवार योजनेच्या कामात झालेला गैरव्यवहार" या विषयावरील तारांकित प्रश्न क्रमांक ६५५६७, दिनांक ९ डिसेंबर, २०१६ रोजी सभागृहात उत्तरीत झाला. या प्रश्नावरील अनुपूरक प्रश्नोत्तराच्या वेळी, मा. सदस्यांनी जलयुक्त शिवार योजना शासनाची असल्यामुळे या योजनेच्या देखभाल व दुरुस्तीसाठी शासनामार्फत निधी पुरविण्याबाबत प्रश्न उपस्थित केला असता, त्यावर शासनाने, कालबद्ध आणि धोरणात्मक कार्यक्रम राबविण्याची आवश्यकता असल्याने याबाबत मेन्टेनन्स, व्हीजिलन्स, दर्जेदार कामे करणे आणि आराखडे निर्माण करणे यासंबंधीचा विषय असलेला एक वेल सेटल्ड विभाग निर्माण करण्याचा निर्णय घेतला.

(४) "हिंगोणी (ता. नेवासा, जि. अहमदनगर) येथील जिल्हा परिषदेच्या प्राथमिक शाळेतील विद्यार्थीनींवर होत असलेला अत्याचार" या विषयावरील तारांकित प्रश्न क्रमांक ८३६९७, दिनांक ३० मार्च, २०१७ रोजी सभागृहात उत्तरीत झाला. या प्रश्नावरील अनुपूरक प्रश्नोत्तराच्या वेळी, शिक्षण विभागात विशेषतः शाळांमध्ये अशा घटना होत असल्यामुळे एक वेगळी वेबसाईट सुरू करण्यात येईल की, ज्या वेबसाईटवर पालकांना, विद्यार्थिनीला किंवा कोणा जबाबदार नागरिकाला काहीही सांगायचे असेल अथवा काही सूचवायचे असेल तर ती माहिती या वेबसाईट टाकल्यास, संबंधितांचे नाव गुप्त ठेऊन या प्रकरणातील व्यक्ती, संस्था आणि शाळा या सर्वांवर कडक कारवाई केली जाईल असा निर्णय शासनाकडून घेण्यात आला.

(५) "सोलापूर शहरात त्रिपुरा चिटफंडने केलेल्या फसवणुकीबाबत" या विषयावरील तारांकित प्रश्न क्रमांक ११५४७६, दिनांक २० मार्च, २०१८ रोजी सभागृहात उत्तरीत झाला. या प्रश्नावरील अनुपूरक प्रश्नोत्तराच्या वेळी, मा. मुख्यमंत्री महोदयांनी अलिकडील काळात इकॉनॉमिक ऑफेन्सच्या घटना मोठ्या प्रमाणात वाढत असून सद्यःस्थितीतील एमपीआयडी या कायद्यामध्ये मालमत्ता जप्त करण्यासंदर्भात, मालमत्ता विकण्यासंदर्भात काही कमतरता असल्यामुळे या कायद्यामध्ये बदल करण्यात येणार असून हे विधेयक पुढील आठवड्यात मांडले जाणार आहे. त्यामुळे ठेवीदारांना संरक्षण देताना मालमत्ता लवकर जप्त करता येईल आणि मालमत्ता लवकर विकता देखील येईल, असे सभागृहास आश्वस्त केले.

तद्नुषंगाने दिनांक २३ मार्च, २०१८ रोजी एमपीआयडी कायद्यात सुधारणा करण्यासंदर्भातील विधेयक सभागृहात मांडण्यात आले. दिनांक १६ जुलै, २०१८ रोजी उक्त विधेयक विधानसभा सभागृहात व दिनांक २० जुलै, २०१८ रोजी विधानमंडळाच्या दोन्ही सभागृहात पारित झाले.

(६) "मुंबईतील पायधुनी येथे बेकायदेशीरित्या इमारतीचे बांधकाम सुरू असल्याबाबत" या विषयावरील तारांकित प्रश्न क्रमांक १०५२७७, दिनांक २७ मार्च, २०१८ रोजी सभागृहात उत्तरीत झाला. उक्त प्रश्नावरील अनुपूरक प्रश्नोत्तरांच्या वेळी मा. तालिका अध्यक्ष महोदयांनी तारांकित प्रश्नाच्या अनुषंगाने उपस्थित करण्यात आलेली घटना अतिशय गंभीर असल्याने अनियमित व बेकायदेशीर बांधकामास जबाबदार असणाऱ्या संबंधित अधिकारी यांना निलंबित करण्याचे आदेश दिले. तद्नुषंगाने मा.मंत्री महोदयांनी उक्त प्रकरणी जबाबदार असलेल्या संबंधित विभागाचे वॉर्ड ऑफिसर, सहाय्यक आयुक्त व बीट ऑफिसर यांना निलंबित करण्यात येत असल्याचे जाहीर केले.

(७) "राज्यातील पुनर्वसित गावठाणांतील भूखंडाच्या मालकीबाबत" या विषयावरील तारांकित प्रश्न क्रमांक १२३८६५, दिनांक ११ जुलै, २०१८ रोजी सभागृहात उत्तरित झाला. उक्त प्रश्नावरील अनुपूरक प्रश्नोत्तरांच्या वेळी राज्यातील प्रकल्पामुळे/ भूसंपादनामुळे विस्थापित झालेल्या बाधित व्यक्तीस पुनर्वसित गावठाणामध्ये

भोगवटादार वर्ग-२ म्हणून वाटप झालेल्या भूखंडाचे भोगवटादार वर्ग-१ मध्ये रुपांतर करण्याबाबत व सदर भूखंडाच्या हस्तांतरण व्यवहारावर असलेले निर्बंध उठविण्यासंदर्भात झालेल्या चर्चेच्या दरम्यान मा. मदत व पुनर्वसन राज्यमंत्री यांनी असे स्पष्ट केले की, शासनाने याबाबत शासन निर्णय काढला असून जेथे मोठ्या प्रमाणावर गावठाण विकसित करण्यात आलेली आहेत अशा ठिकाणी शिबिरे घेऊन भोगवटादार वर्ग-२ म्हणून वाटप झालेल्या भूखंडाचे भोगवटादार वर्ग-१ मध्ये रुपांतर करणे व इतर सर्व प्रकरणे निकालात काढण्यात येतील व उक्त कामांसाठी जिल्ह्याच्या ठिकाणी अप्पर जिल्हाधिकारी, संबंधित तहसीलदार यांचेकडून दुरुस्तीचे आदेश करण्यात येतील असा निर्णय घेतला.

(८) "राज्यातील प्राथमिक, माध्यमिक व उच्च माध्यमिक शाळांमधील शिक्षकांच्या नियमबाह्य नियुक्त्यांची मान्यता रद्द करण्याबाबत" या विषयावरील तारांकित प्रश्न क्रमांक १२७३२०, दिनांक ३० नोव्हेंबर, २०१८ रोजी सभागृहात उत्तरित झाला. राज्यातील प्राथमिक, माध्यमिक व उच्च माध्यमिक शाळांमधील शासनाचे अनुदान घेऊन चालविल्या जाणाऱ्या अनुदानित शाळांमध्ये सन २०१२ नंतरच्या शालेय शिक्षक व शिक्षकेत्तर अशा ४०११ कर्मचाऱ्यांच्या नियुक्त्यांना मान्यता देताना अनियमितता झाली असल्याबाबतचा विषय असल्याने या प्रश्नावरील अनुपूरक प्रश्नोत्तराच्या वेळी शासनाने, दिनांक २० जून, २०१८ रोजी, पवित्र या संगणकीय प्रणालीद्वारे राज्यातील सर्व व्यवस्थापनांच्या शाळांमधील शिक्षक निवडीसाठी पारदर्शक पद्धती विहीत करण्याबाबत, या विषयांकित शासन निर्णय निर्गमित करण्यात आला असून त्यानुसार पवित्र या संगणकीय प्रणालीच्या माध्यमातून शाळांमधील शिक्षकांची भरती करण्यात येणार असल्याने भरती प्रकरणी संस्था किंवा अधिकारी यांना अनियमितता करण्यास वाव राहणार नसून यापुढील कालावधीत अनियमितता व भ्रष्टाचार थांबण्याच्या दृष्टीने ऑनलाईन भरती करण्यात येईल असा निर्णय घेण्यात आला.

(९) "जेऊर, कोर्टी, बोरगाव व कव्हे (ता. करमाळा, जि. सोलापूर) येथील प्रादेशिक पाणीपुरवठा योजना सौर उर्जेवर स्वयंचलित करण्याबाबत" या विषयावरील तारांकित प्रश्न क्रमांक १३९०९८, दिनांक १ जुलै, २०१९ रोजी सभागृहात उत्तरीत झाला. या

प्रश्नावरील अनुपूरक प्रश्नोत्तराच्या वेळी, वीज बिल थकबाकीमुळे राज्यातील पिण्याच्या पाण्याच्या योजना बंद पडू नये यासाठी "मुख्यमंत्री पेय जल योजना" सौर उर्जेवर स्वयंचलित करण्यासाठी धोरणात्मक निर्णय घेण्यात आला असून, राज्यातील सर्व योजना सौर उर्जेवर स्वयंचलीत करण्यासाठी प्रस्ताव तयार करण्याचे काम सुरू करण्याचा निर्णय घेण्यात आला.

(१०) "राज्यातील विशेषतः पश्चिम विदर्भातील भूजल पातळीत वाढ करण्यासाठी कृती आराखडा तयार करण्याबाबत" या विषयावरील तारांकित प्रश्न क्रमांक १३५२२९ दिनांक १ जुलै, २०१९ रोजी सभागृहात उत्तरित झाला. या प्रश्नावरील अनुपूरक प्रश्नोत्तराच्या वेळी, " गावांच्या पिण्याच्या पाण्याच्या विहीरीजवळ किंवा उद्‌भवाजवळ ५०० मीटरच्या आत दुसरा उद्‌भव घेतात, विहीरी खोदतात किंवा बोअरवेल घेतात, त्यामुळे पाण्याची पातळी कमी होते. तद्‌नुषंगाने राज्यभरामध्ये पिण्याच्या पाण्याच्या योजनेच्या बाजूला ५०० मीटर अंतरापर्यंत कोणी बोअर घेतला असेल, विहिर खोदली असेल तर त्यांची संपूर्ण माहिती घेऊन जेथे जेथे कायद्याचे उल्लंघन झाले आहे तेथे फौजदारी गुन्हे दाखल करण्यात येईल " असा निर्णय शासनाने घेतला.

**अर्धा-तास चर्चा** (म.वि.स. नियम ९४)

महाराष्ट्र विधानसभा नियम ९४ मधील तरतुदींच्या अनुषंगाने अर्धा-तास चर्चेबाबत मा. अध्यक्ष यांनी दिलेल्या निदेश क्रमांक १२ नुसार अर्धा-तास चर्चेसाठी नेमून दिलेल्या मंगळवार व गुरुवार या दोन दिवसांपैकी प्रत्येक मंगळवार हा दिवस विधानसभेत नुकत्याच उत्तर दिलेल्या तारांकित किंवा अतारांकित प्रश्नांच्या उत्तरातून उद्‌भवलेल्या पुरेशा सार्वजनिक महत्त्वाच्या बाबींवर चर्चा उपस्थित करण्यासाठी नेमून देण्यात आला आहे.

प्रश्नाच्या उत्तरातून उद्‌भवणारी अर्धा-तास चर्चा या आयुधाकरिता QIS ही संगणकीय प्रणाली विकसित करण्यात आली असून, या संगणकीय प्रणालीद्वारे सदस्यांकडून अर्धा-तास चर्चेची सूचना स्वीकारणे, सूचना कार्यवाहीत घेणे, सादर करणे, स्वीकृत अर्धा-तास चर्चेची सूचना विभागास पाठविणे, स्वीकृत सूचनांचे सदस्यनिहाय बॅलट काढणे इ. सर्व कामे केली जातात.

प्रश्नातून उद्‌भवणाऱ्या तसेच इतर सार्वजनिक महत्त्वाच्या बाबींवर उपस्थित करावयाच्या अर्धा-तास चर्चेसंबंधीच्या तरतुदी "म.वि.स. नियम ९४" मध्ये करण्यात आल्या आहेत. अर्धा-तास चर्चेची सूचना देताना खालील गोष्टींकडे सदस्यांनी लक्ष पुरविणे आवश्यक आहे :—

(१) अर्धा-तास चर्चेची सूचना प्रश्नोत्तरातून उद्‌भवलेली असेल तर ती अलिकडच्या प्रश्नोत्तरातून उद्‌भवलेल्या बाबींवर असली पाहिजे.

(२) ती सार्वजनिक महत्त्वाची असली पाहिजे.

(३) प्रश्नाधीन बाबीसंबंधात राज्य शासनाची जबाबदारी असली पाहिजे.

(४) विधानसभेत प्रश्नाला दिलेल्या उत्तरातून उद्‌भवणाऱ्या सार्वजनिक महत्त्वाच्या बाबींवर मा. सदस्यांना अर्धा-तास चर्चेची सूचना QIS या संगणकीय प्रणालीद्वारे देता येते. अशी सूचना गुणवत्तेनुसार स्वीकृत करण्यात आल्यास ती आठवड्यातील प्रत्येक मंगळवारी कामकाजाच्या दिवशी विधानसभेच्या बैठकीच्या शेवटी ठेवण्यात येते.

(५) मा. सदस्यांना अर्धा-तास चर्चेची सूचना उपस्थित करावयाची असेल तर ज्या दिवशी अशी बाब उपस्थित करावयाची असेल, त्या दिवसाच्या अगोदर तीनपेक्षा कमी नसतील इतके दिवस, मा. सदस्यांनी तशी सूचना QIS या संगणकीय प्रणालीद्वारे दिली पाहिजे आणि त्यांना जे मुद्दे उपस्थित करावयाचे असतील ते मुद्दे थोडक्यात सूचनेमध्ये नमूद केले पाहिजेत, तसेच अर्धा-तास चर्चा उपस्थित करण्याची कारणे नमूद करणारी एक स्पष्टीकरणात्मक टीप सदर सूचनेबरोबर दिली पाहिजे. अशा सूचनेला कमीत कमी दोन सदस्यांनी अनुमोदन म्हणून QIS या संगणकीय प्रणालीद्वारे पाठिंबा दिला असणे गरजेचे आहे **[ म.वि.स. नियम ९४ (२) (अ) ].** मा.अध्यक्षांना संबंधित विभागाच्या प्रभारी मंत्र्यांच्या संमतीने त्यांना योग्य वाटेल अशा कोणत्याही बाबतीत सूचनेची मुदत कमी करता येईल किंवा सूचना अनावश्यक ठरविता येईल. परंतु सूचना देणारा सदस्य अनुपस्थित असल्यास त्या सूचनेस अनुमोदन देणाऱ्या कोणत्याही सदस्यास मा. अध्यक्षांच्या परवानगीने चर्चेस सुरुवात करता येईल.

(६) एका दिवशी फक्त दोनच अर्धा-तास चर्चेच्या सूचना घेण्यात येतात. स्वीकृत सूचनांचा पारस्पारिक प्राथम्यक्रम ठरविण्यासाठी QIS या संगणकीय प्रणालीद्वारे **सदस्यनिहाय** बॅलट घेण्यात येते व त्यानुसार सूचना दिवसाच्या कामकाजाच्या क्रमात दाखविण्यात येतात. परंतु एखाद्या विवक्षित दिवशी चर्चेकरिता मांडण्यात आलेली कोणतीही बाब त्या दिवशी निकालात काढण्यात आली नसेल तर ती बाब सदस्यांची तशी इच्छा असेल त्याखेरीज कोणत्याही पुढील दिवशी मांडण्यात येणार नाही. सदस्यांची तशी इच्छा असेल तेव्हा त्या बाबीचा लगतपुढील उपलब्ध दिवसासाठीच्या बॅलटमध्ये समावेश करण्यात येईल.

(७) मंगळवार रोजी दिवसाच्या कामकाजाच्या क्रमात दर्शविण्यात येणाऱ्या प्रश्नातून उद्भवणाऱ्या अर्धा-तास चर्चेच्या स्वीकृत सूचनांचा पारस्पारिक प्राथम्यक्रम ठरविण्यासाठी सदस्यनिहाय बॅलट आदल्या दिवशी म्हणजे **सोमवारी सकाळी १०.३० वाजता** QIS या संगणकीय प्रणालीद्वारे घेण्यात येते. सोमवारी सार्वजनिक सुट्टी असल्यास, बॅलट त्याच्या आधीच्या आठवड्यातील कामकाजाच्या शेवटच्या दिवशी सकाळी १०-३० वाजता घेण्यात येते. यासंबंधात सदस्यांना **पत्रक भाग (२) द्वारे व लघुसंदेशाद्वारे (एस.एम.एस.)** आगाऊ माहिती दिली जाते.

(८) सभागृहात संबंधित सदस्य उपस्थित केलेल्या मुद्द्यांवर निवेदन करतात व त्यावर संबंधित मंत्री उत्तरादाखल निवेदन करतात. त्यानंतर सदस्यांना वा अन्य काही पूर्वसूचना दिलेल्या सदस्यांना माहिती मिळविण्याच्या दृष्टीने दोन-तीन प्रश्न विचारण्याची मा. अध्यक्ष परवानगी देऊ शकतात. अर्धा-तास चर्चेची व्याप्ती ही मर्यादित असते. ३० मिनिटांत दोन अर्धा-तास चर्चा उपस्थित करावयाच्या असतात.

मा. सदस्यांनी प्रश्नांच्या संदर्भात दिलेली अर्धा-तास चर्चेची सूचना खालील कारणांमुळे अस्वीकार्य ठरते :–

एखाद्या विशिष्ट दिवशी सभागृहामध्ये उत्तरासाठी ठेवलेला तारांकित प्रश्न, संबंधित सदस्यांच्या अनुपस्थितीमुळे अनुत्तरित राहिल्यास तो प्रश्न अतारांकित समजला जातो. त्या

प्रश्नाबाबत त्याच सदस्यांनी अथवा अन्य सदस्यांनी दिलेली अर्धा-तास चर्चेची सूचना अस्वीकार्य ठरते.

तेराव्या विधानसभेच्या सन २०१४ ते २०१९ या कालावधीत झालेल्या एकूण १८ अधिवेशनांपैकी अर्धा-तास चर्चा ठेवलेल्या एकूण १५ अधिवेशनांमध्ये मा. सदस्यांकडून एकूण ६८८ अर्धा-तास चर्चेच्या सूचना प्राप्त झाल्या. त्यापैकी ४२७ सूचना स्वीकृत करण्यात आल्या व ५१ अर्धा-तास चर्चेच्या सूचनांवर सभागृहात चर्चा झाली.

शासकीय मध्यवर्ती मुद्रणालय, मुंबई